**प्रेस नोट दि.१०.०६.१९**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे**

**एका तासाच्या आत लहान मुलाच्या नातेवाईकांचा शोध घेवुन सुखरुप ताब्यात दिले**

दिनांक १०/०६/२०१९ रोजी सायंकाळी ०७/०० वा चे सुमारास कोंढवा बीट मार्शल कर्मचारी पोशि दाभाडे, पोशि जडे असे कोंढवा पोलीस चौकीचे हद्दीत गस्त करीत असताना संत गाडगेमहाराज शाळा कोंढवा खु पुणे येथे एक लहान मुलगा रडत बसलेला मिळुन आला बीट मार्शल कर्मचारी यांनी तात्काळ त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली परंतु तो खुप घाबरलेला असल्याने त्यास काहीही सांगता येत नव्हते, कोंढवा भाग हा मिश्र लोकवस्तीचा असल्याने सदरचा मुलगा कोणत्या भागातील असल्याचे समजुन येत नसल्यामुळे त्याचे नातेवाईक यांचा शोध मध्ये अडचण निर्माण झाली होती. स्थानिक इसम नामे अल्ताफ अब्दुल अहमद शेख वय ५५ वर्षे रा ३५४ शिवगंगा सोसायटी जवळ कोंढवा खु पुणे यांच्या मदतीने तसेच कोंढवा पोलीस स्टेशनच्या मार्फतीने कम्युनिटी पोलीसींगच्या माध्यामातुन व्हाट्सग्रुप तयार करण्यात आलेले होते त्या ग्रुपवर सदर मुलाबाबत त्याचे नातेवाईक याचा शोध घेणेबाबत मेसेज तयार करुन व्हाट्सग्रुप तयार करण्यात आलेले होते त्या ग्रुपवर सदर मुलाबाबत त्याचे नातेवाईक यांचा शोध घेणेबाबत मेसेज तयार करुन व्हाट्स ग्रुपवर टाकण्यात आला तसेच कोंढवा चौकी अधिकारी पोलीस उप निरी अकुंश कर्चे व इतर स्टाफ यांचे मदतीने सदरच्या लहान मुलाच्या नातेवाईकांचा भाग्योदयनगर, मिठानगर, शिवनेरीनगर साईबाबानगर या बागात शोध घेत असताना महिला नामे शबीना आरीफ खान रा साईबाबनगर कोंढवा खु पुणे या त्याचे हरवलेल्या लहान मुलास शोधत असताना मिळुन आल्या त्याना त्याचे मुलाचे नाव फोटे यांची खात्री करता मुलाचे नाव मोहंमद बिलाल खान, वय ३ वर्षे असे असल्याचे सांगितले त्यानी सांगितलेल्या मुलाचे वर्णानावरुन व फोटेवरुन खात्री करुन सदरच्या मुलास कुटुबिंयाच्या सुखरुप ताब्यात देण्यात आलेले आहे मुलाच्या नातेवाईकांनी कोंढवा पोलीसांचे आभार मानले तसेच कोंढवा पोलीस स्टेशनच्या वतीने लहान मुलांची व्यवस्थित देखभाल करण्याबाबत आवाहन करण्यात आलेले आहे सदरची कामगिरी ही मा. वपोनि अनिल पाटील , मा पोनि गुन्हे श्री कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरी श्री अंकुश कर्चे , पोशि दाभाडे , पोशि जडे व कोंढवा चौकी स्टाफ यांनी केली.